निपक्ष व निर्भिड वृत्तपत्र

# आत्ताच एक्सप्रेस

छत्रपती संभाजीनगर
पाने : ४
किंमत : २.००
वर्ष : १५ वे
अंक : २६१ वा.
मंगळवार :२५ नोव्हेंबर २०२५

मुख्य संपादक- सुग्रीव मुंढे | E-mail:dainikattachexpress@gmail.com | E-Paper : http://attachexpress.in | Post Regd.No. ABD-441/2024-26 | RNI.No.MAH/MAR2011/39247

# बॉलिवूडमधील दिग्गज अभिनेते धर्मेंद्र देओल यांचं निधन

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई/ प्रतिनिधी/** बॉलिवूडमधील दिग्गज अभिनेते धर्मेंद्र देओल यांचं सोमवार २४ नोव्हेंबर २०२५ रोजी निधन झालं. धर्मेंद्र यांनी त्यांच्या कारकिर्दीत जवळपास ३०० हून अधिक चित्रपटांमध्ये काम केलं होतं. धर्मेंद्र यांना बॉलिवूडचा 'ही-मॅन' असं म्हटलं जायचं. त्यांनी जवळपास ६ दशक आपल्या चित्रपटांच्या माध्यमातून प्रेक्षकांचं मनोरंजन केलं. धर्मेंद्र यांनी भूमिका साकारलेले हिंदी आणि पंजाबी चित्रपट अनेकांनी पाहिले असतील, मात्र दिग्गज अभिनेते असलेल्या धर्मेंद्र यांनी कधी काळी मराठी चित्रपटात सुद्धा एक भूमिका केली होती.

धर्मेंद्र यांचे गाजलेले चित्रपट : धर्मेंद्र यांनी त्यांच्या कारकिर्दीत अनेक हिट चित्रपट दिले. यात शोले (१९७५), चुपके चुपके (१९७५), सीता और गीता (१९७२), धरमवीर (१९७७), आंखे (१९६८), राजा (१९७५), फूल और पत्थर (१९६६), सत्यकाम (१९६९), यादों की बारात (१९७३), यमला पगला दीवाना (२०११) - कॉमेडी-एक्शन फिल्म, आया सावन झूमके (१९६९), जीवन मृत्यु (१९७०) इत्यादी चित्रपटांचा समावेश आहे. धर्मेंद्र यांचा पहिला चित्रपट 'दिल भी तेरा हम भी तेरे' (१९६०) होता. तर शेवटचा चित्रपट 'इक्कीस' (२०२५) हा ठरला. जो येत्या २५ डिसेंबर २०२५ रोजी प्रदर्शित होणार आहे. 'इक्कीस' हा चित्रपट भारत-पाकिस्तान युद्धादरम्यान अरुण खेत्रपाल या तरुण सैनिकाच्या कहाणीवर आधारित आहे.


बॉलिवूडचे 'ही-मॅन' : सुरुवातीला धर्मेंद्र त्यांच्या पहिल्या काही चित्रपटांमध्ये रोमँटिक हिरो म्हणून दिसले, परंतु त्यानंतर 'शोला और शबनम' सारख्या चित्रपटांनी त्यांना वेगळी ओळख मिळवून दिली. त्यानंतर त्यांनी पुन्हा कधी मागे वळून पाहिलं नाही. अभिनेते धर्मेंद्र यांचं खरं सुपरस्टारडम १९६६ मध्ये आलेल्या 'फूल और पत्थर' या चित्रपटापासून सुरु झालं. या चित्रपटात त्यांनी शर्टलेस अॅक्शन सीक्वेन्स केले ज्यामुळे बॉलीवूडमध्ये एक नवीन ट्रेंड सुरू झाला. या चित्रपटात धर्मेंद्र यांच्या शक्तिशाली शरीरयष्टी आणि उत्साही शैलीमुळे त्यांना 'ही-मॅन ऑफ बॉलीवूड' ही पदवी मिळाली.

धर्मेंद्र यांचा मराठी चित्रपट : बॉलिवूडमधील दिग्गज अभिनेते धर्मेंद्र देओल यांनी मैत्री खातीर एका मराठी चित्रपटात लहानशी भूमिका साकारली होती. जेष्ठ चित्रपट समीक्षक दिलीप ठाकूर यांनी सांगितलं की मुंबईतील चांदिवली स्टुडिओचे मालक हेमंत कदम आणि धर्मेंद्र यांची मैत्री होती. तेव्हा मैत्री खातीर धर्मेंद्र यांनी हेमंत कदम यांच्या 'हिचं काय चुकलं' या चित्रपटातील गाण्यासाठी शूटिंग केलं होतं. 'घेऊन टांगा सर्जा निघाला, दूर धन्याच गाव... अरे तू धाव' असं या गाण्याचं नाव होतं. या गाण्यात धर्मेंद्र विक्रम गोखलेंसोबत दिसून आले होते. अभिनेते धर्मेंद्र यांचा एकमेव मराठी चित्रपट, 'ही' भूमिका साकारली होती, तुम्ही पाहिलात का?

उहरीशपवीर चरीरींहळ चेींळश : बॉलिवूडमधील दिग्गज अभिनेते धर्मेंद्र देओल (उहरीशपवीर ऊशेश्र) यांचं सोमवार २४ नोव्हेंबर २०२५ रोजी निधन झालं. धर्मेंद्र यांनी त्यांच्या कारकिर्दीत जवळपास ३०० हून अधिक चित्रपटांमध्ये काम केलं होतं. धर्मेंद्र यांना बॉलिवूडचा 'ही-मॅन' असं म्हटलं जायचं. त्यांनी जवळपास ६ दशक आपल्या चित्रपटांच्या माध्यमातून प्रेक्षकांचं मनोरंजन केलं. धर्मेंद्र यांनी भूमिका साकारलेले हिंदी आणि पंजाबी चित्रपट अनेकांनी पाहिले असतील, मात्र दिग्गज अभिनेते असलेल्या धर्मेंद्र यांनी कधी काळी मराठी चित्रपटात सुद्धा एक भूमिका केली होती.

धर्मेंद्र यांचे गाजलेले चित्रपट : धर्मेंद्र यांनी त्यांच्या कारकिर्दीत अनेक हिट चित्रपट दिले. यात शोले (१९७५), चुपके चुपके (१९७५), सीता और गीता (१९७२), धरमवीर (१९७७), आंखे (१९६८), राजा (१९७५), फूल और पत्थर (१९६६), सत्यकाम (१९६९), यादों की बारात (१९७३), यमला पगला दीवाना (२०११) - कॉमेडी-एक्शन फिल्म, आया सावन झूमके (१९६९), जीवन मृत्यु (१९७०) इत्यादी चित्रपटांचा समावेश आहे. धर्मेंद्र यांचा पहिला चित्रपट 'दिल भी तेरा हम भी तेरे' (१९६०) होता. तर शेवटचा चित्रपट 'इक्कीस' (२०२५) हा ठरला. जो येत्या २५ डिसेंबर २०२५ रोजी प्रदर्शित होणार आहे. 'इक्कीस' हा चित्रपट भारत-पाकिस्तान युद्धादरम्यान अरुण खेत्रपाल या तरुण सैनिकाच्या कहाणीवर आधारित आहे.

बॉलिवूडचे 'ही-मॅन' : सुरुवातीला धर्मेंद्र त्यांच्या पहिल्या काही चित्रपटांमध्ये रोमँटिक हिरो म्हणून दिसले, परंतु त्यानंतर 'शोला और शबनम' सारख्या चित्रपटांनी त्यांना वेगळी ओळख मिळवून दिली. त्यानंतर त्यांनी पुन्हा कधी मागे वळून पाहिलं नाही. अभिनेते धर्मेंद्र यांचं खरं सुपरस्टारडम १९६६ मध्ये आलेल्या 'फूल और पत्थर' या चित्रपटापासून सुरु झालं. या चित्रपटात त्यांनी शर्टलेस अॅक्शन सीक्वेन्स केले ज्यामुळे बॉलीवूडमध्ये एक नवीन ट्रेंड सुरू झाला. या चित्रपटात धर्मेंद्र यांच्या शक्तिशाली शरीरयष्टी आणि उत्साही शैलीमुळे त्यांना 'ही-मॅन ऑफ बॉलीवूड' ही पदवी मिळाली.



धर्मेंद्र यांचा मराठी चित्रपट : बॉलिवूडमधील दिग्गज अभिनेते धर्मेंद्र देओल यांनी मैत्री खातीर एका मराठी चित्रपटात लहानशी भूमिका साकारली होती. जेष्ठ चित्रपट समीक्षक दिलीप ठाकूर यांनी सांगितलं की मुंबईतील चांदिवली स्टुडिओचे मालक हेमंत कदम आणि धर्मेंद्र यांची मैत्री होती. तेव्हा मैत्री खातीर धर्मेंद्र यांनी हेमंत कदम यांच्या 'हिचं काय चुकलं' या चित्रपटातील गाण्यासाठी शूटिंग केलं होतं. 'घेऊन टांगा सर्जा निघाला, दूर धन्याच गाव... अरे तू धाव' असं या गाण्याचं नाव होतं. या गाण्यात धर्मेंद्र विक्रम गोखलेंसोबत दिसून आले होते.

## चित्रपट सृष्टीचा सुवर्णकाळ गाजवणारा तारा निखळला - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई/प्रतिनिधी/**भारतीय चित्रपटसृष्टीचा सुवर्णकाळ गाजवणारा लखलखता तारा निखळल्याची शोकभावना व्यक्त करून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ज्येष्ठ अभिनेते पद्मभूषण धर्मेंद्र यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली आहे.स्वप्नाळू, युवा नायक ते तडफदार-बलंदड नायक म्हणून साकारलेल्या वैविध्यपूर्ण भूमिका आणि पुढे बॉलिवुडचा हि-मॅन म्हणून लौकीक मिळवेलेले




ज्येष्ठ अभिनेते धर्मेंद्र चित्रपट रसिकांच्या सदैव स्मरणात राहतील, असे मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी म्हटले आहे.शोकसंदेशात मुख्यमंत्री फडणवीस म्हणतात की, ज्येष्ठ अभिनेते धर्मेंद्र यांचा हिंदी चित्रपट सृष्टीतला प्रवास वैशिष्ट्यपूर्ण राहिला. कृष्ण-धवल काळ ते रंगीत आणि अलिकडच्या तांत्रिकदृष्ट्या आधुनिक प्रवाहात ते कार्यशील राहिले. ते चित्रपट सृष्टीतील बदलाचे, भरभराटीपासून ते आतापर्यंतच्या काळाचे महत्वाचे साक्षीदार राहिले. नायक म्हणून तरूण वयात सालस, स्वप्नाळू नायक ते विविध चित्रपटात वाट्याला आलेल्या भूमिका त्यांनी अभिनयाने आयकॉनिक ठरवल्या. शोले चित्रपटातील पडद्यावरील वीरू प्रमाणेच ते प्रत्यक्षातही मैत्र जपणारे होते. सहृदय आणि जुन्या-नव्या पिढीला जोडणारे, अनेकांसाठी आधार, मार्गदर्शक व्यक्तिमत्व म्हणून त्यांची ख्याती होती. या क्षेत्रातील ज्येष्ठत्व ते तितक्याच उमद्यापणाने मिरवत असत. मध्यंतरी त्यांनी लोकसभेत खासदार म्हणून बिकानेरचे प्रतिनिधीत्व केले होते. पण त्यांनी चित्रपटसृष्टी आणि अभिनय, या क्षेत्रातील प्रयोगशीलता यांनाच अधिक प्राधान्य दिले. सुमारे तीनशेहून अधिक चित्रपटांमध्ये त्यांनी वैविध्यपूर्ण भूमिका साकारल्या. एकाच वर्षात ९ हिट चित्रपट देण्याचा विक्रम त्यांच्या नावावर आहे. आयुष्याच्या अखेरच्या क्षणापर्यंत ते चित्रपट सृष्टीत सक्रिय राहिले. त्यांच्या निधनाने आपल्या चित्रपट सृष्टीचा सुवर्णकाळ गाजवणारा तारा निखळला आहे.ज्येष्ठ अभिनेते धर्मेंद्र यांच्या निधनामुळे देओल कुटुंबीयांसह, त्यांच्या चाहत्यांवर दु:खाचा आघात झाला आहे. आम्ही या सर्वांच्या दु:खात सहभागी असून त्यांना ईश्वराने आघात सहन करण्याची ताकद द्यावी, अशी प्रार्थना करतो. ज्येष्ठ अभिनेते धर्मेंद्र यांच्या निधनामुळे चित्रपट सृष्टीची मोठी हानी झाली असून त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे.

# कुक्कडगाव ग्रामपंचायतीच्या वित्त आयोगाच्या निधीबाबत गंभीर गैरव्यवहार

**आत्ताच एक्सप्रेस**

**अबंड/ प्रतिनिधी/**अंबड तालुक्यातील कुक्कडगाव ग्रामपंचायतीच्या वित्त आयोगाच्या निधीबाबत गंभीर गैरव्यवहाराचे आरोप ग्रामस्थांकडून समोर आले आहेत. ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, गावाच्या विकासासाठी अनिवार्य असलेला निधी प्रत्यक्ष कामांवर खर्च झाला आहे का, हे स्पष्टपणे समोर आलेले नाही. ग्रामपंचायत कार्यालयाने निधीच्या खर्चाबाबत कोणतेही ठोस पुरावे दिलेले




नाहीत, त्यामुळे या निधीच्या बेपत्ते झाल्याची शंका आता ठोस स्वरूप घेऊ लागली आहे.

ग्रामस्थांनी स्पष्ट केले आहे की, गावात प्रत्यक्षात कोणतेही मूलभूत विकासकाम झालेले दिसत नाही, तरीही पंचायत कार्यालयीन नोंदीत वित्त आयोगाचा निधी पूर्णपणे वापरण्यात आल्याचा दाखला दिला जात आहे. मंजूर कामांची यादी, बिलं-पावत्या, खर्चाचा तपशील किंवा पूर्णता अहवाल यासंबंधी कोणतेही पारदर्शक कागदपत्र ग्रामस्थांना उपलब्ध झालेले नाही. त्यामुळे निधीच्या वास्तविक स्थितीबाबत गावकऱ्यांमध्ये संभ्रम आणि संताप निर्माण झाला आहे.

या प्रकरणी सोपानराव गायकवाड यांनी जालना जिल्हाधिकारी आशिमा मित्तल आणि जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मिन्नू पी. एम. यांच्याकडे अनेक वेळा लिखित तक्रारी दाखल केल्या आहेत. गायकवाड म्हणतात की, *वित्त आयोगाचा निधी ग्रामसभेच्या ठरावानुसार मुलभूत सुविधांसाठी खर्च करणे अनिवार्य आहे, परंतु कुक्कडगावात ग्रामसभा केवळ कागदावरच घेतली गेली आणि निधी परस्पर उचलून घेतल्याचा संशय स्पष्ट आहे. तक्रारी असूनही कुठलीही तपासणी किंवा कारवाई सुरू झालेली नाही.

वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून या प्रकरणी कोणताही सकारात्मक प्रतिसाद न मिळाल्याने ग्रामस्थांचा संताप वाढला आहे. निधीचा पत्ता लागत नसल्यामुळे गावकऱ्यांनी उपरोधिक प्रश्न उपस्थित केला आहे: गावाचा वित्त आयोगाचा निधी पूर्णतः बेपत्ता आहे. अधिकारी तपास करत नाहीत. तर मग पोलिसात 'मिसिंग कंप्लेंट' दाखल करावी का? हा प्रश्न प्रशासनाच्या निष्क्रियतेवर सरळ बोट ठेवणारा ठरत आहे.

ग्रामपंचायत कार्यालयाने यावर कोणतीही स्पष्ट अधिकृत प्रतिक्रिया दिलेली नाही, केवळ हिशेब तपासात आहे.एवढेच उत्तर दिले आहे. यामुळे ग्रामस्थांच्या शंका अधिक गडद होत चालल्या आहेत.

सोपानराव गायकवाड यांनी आता पुढील पायऱ्या उचलत या प्रकरणी विस्तृत तक्रार तयार करण्यास सुरुवात केली आहे. या तक्रारीत मुख्य मागण्या खालीलप्रमाणे असतील:

१.वित्त आयोगाच्या निधीचा संपूर्ण ऑडिट तपास: निधी प्रत्यक्ष कुठे, कसे आणि किती प्रमाणात वापरण्यात आला याची स्पष्ट माहिती मिळावी.

२.ग्रामसभेत खर्चाचे पारदर्शक वाचन: ग्रामसभेत निधीचा खर्च आणि कामांचे अहवाल ग्रामस्थांसमोर ठळकपणे मांडले जावे.

३.गैरव्यवहार आढळल्यास जबाबदारांवर गुन्हा नोंदवणे: निधी दुरुपयोग केल्याचे आढळल्यास संबंधित अधिकार्यांवर योग्य ती कायदेशीर कारवाई करणे.

४.निधी परस्पर काढला असल्यास फिर्यादी म्हणून कारवाई सुरू करणे: निधी गैरवापराचे पुरावे मिळाल्यास पोलिसात तक्रार दाखल करून उचित तपास सुनिश्चित करणे.ग्रामस्थांचा मुख्य प्रश्न अजूनही शिल्लक आहे-वित्त आयोगाचा निधी प्रत्यक्षात वापरण्यात आला की अन्यत्र वळवण्यात आला, किंवा खरोखर गायब झाला? पंचायत, पंचायत समिती किंवा जिल्हाधिकारी पातळीवर अद्याप याबाबत कोणताही खुलासा झालेला नाही.निधीच्या अदृश्यतेमुळे आणि प्रशासनाच्या निष्क्रियतेमुळे कुक्कडगावात एकच चर्चा रंगली आहे की, वित्त आयोगाचा निधी हरवला शेवटी पोलिसात मिसिंग तक्रार करावी लागणार का? ग्रामस्थ आता केवळ त्यांच्या हक्कासाठीच नव्हे तर गावाच्या विकासासाठी देखील प्रशासनाकडे योग्य ती कारवाई करण्याची मागणी करत आहेत.

# गावखेडी सोडा, आता मुंबईतही बिबट्याची दहशत

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई /प्रतिनिधी/** गेल्या काही महिन्यात गावोगावी येणाऱ्या बिबट्याची दहशत हा लोकांच्या जीवनमरणाचा प्रश्न बनला आहे. पुणे जिल्ह्यातील नागरिक ह्या समस्येने त्रस्त असताना आता बिबट्याचे मुंबईतील संभाव्य हल्ले रोखण्यासाठी शिवसेना ठाकरे गटाचे आमदार सुनील प्रभू यांनी वनमंत्री गणेश नाईक यांना पत्र लिहिले आहे.

गोरेगावच्या दिंडोशी विधानसभा क्षेत्रातील न्यू दिंडोशी रॉयल हिल्स सोसायटीमध्ये संजय गांधी राष्ट्रीय उद्यानातून रात्री अपरात्री बिबटयाचा वावर पाहायला मिळत आहे, हा बिबट्या कॅमेरात सुद्धा कैद झाला आहे. बिबट्याच्या या मुक्त संचारामुळे येथील रहिवाशी लोकांमध्ये भीतीचे आणि असुरक्षितेचे वातावरण पसरले आहे.

गावखेड्यात बिबट्याचा संचार आता जणू सर्वसामान्य बाब बनली आहे. कारण, पुणे जिल्ह्यातील विविध तालुक्यात मोठ्या संख्येने बिबट्यांचा रात्री मुक्त संचार पाहायला मिळत आहे. बिबट्याच्या हल्ल्यात तीन ते चार नागरिकांचा आत्तापर्यंत मृत्यू झाला असून त्यात एका लहान चिमुकलीचाही समावेश आहे. त्यामुळे, नागरिकांमध्ये वन विभागाबद्दल प्रचंड राग आहे. त्यातच, आता बिबट्या मुंबईतही मुक्त संचार होत असल्याने सोसायटीतील नागरिकही भयभीत झाले आहेत. गोरेगावमधील या भागात अगोदर संरक्षण जाळ्या बसवण्यात आल्या होत्या. मात्र, या जाळ्या ओलांडून बिबट्या सोसायटीमध्ये येत आहेत. त्याच, अनुषंगाने सोसायटी सदस्यांच्या पत्राचा दाखला देत, आमदार सुनिल प्रभू यांनी वनमंत्री गणेश नाईक यांना पत्र लिहलं आहे. बिबट्याचे संभाव्य हल्ले आणि जीवितहानी रोखण्यासाठी तातडीने उपाययोजना करण्याचे निर्देश द्यावेत, असे आमदार प्रभू यांनी पत्रात म्हटले आहे.

गोरेगाव पूर्व दिंडोशी विधानसभा क्षेत्रात, संजय गांधी राष्ट्रीय उद्यानालगत असलेल्या, न्यु दिंडोशी रॉयल हिल्स को. ऑप. हौ. सोसायटीचे ७७ रो-हाऊस व शेजारी न्यु म्हाडा कॉलनी असून एंकदरित या परिसरात सुमारे ५



हजार रहिवाशी वास्तव्य करीत आहेत. सदरहू परिसरात माहे-आक्टोंबरपासून रात्री- अपरात्री बिबटयांचा संचार होत आहे. या परिसरातील रहिवाशी जनतेमध्ये भीतीचे व असुरक्षिततेचे वातावरण निर्माण झाले आहे. सदरहू परिसरात बिबट्याचे तसेच अन्य वन्यजीवांचा संचार होत असल्यामुळे भविष्यात होणारी जीवीतहानी रोखण्यासाठी व वन्यजीवांचे संरक्षण होऊन निसर्गाचा समतोल राखण्यासाठी उपरोक्त सोसायटीच्या आवारात २६ मे २०२३ रोजी सुमारास संरक्षणासाठी म्हाडाची परवानगी घेऊन संरक्षण जाळया बसविण्यात आल्या होत्या, परंतू बिबटे संरक्षण जाळी ओलांडून सोसायटीच्या आवारात येत असल्याचे, येथील रहिवाश्यांच्या निदर्शनास आले आहे.

शेजारील संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाची ६ फुट उंच जाळी ओलांडून बिबटे सोसायटी परिसरात प्रवेश करित आहेत. त्यामुळे, या परिसरातील नागरिक जीव मुठीत घेऊन, भीतीदायक जीवन जगत असून नागरिकांना दिवसा ढवळया बाहेर पडणे देखील कठीण झाले आहे, असे आमदार प्रभू यांनी वनमंत्र्यांना लिहिलेल्या पत्रात म्हटलं आहे.

# शाश्वत शेतीला परिमाण देण्यासाठी मध उद्योगाची जोड द्या: अशोक सिरसे



**आत्ताच एक्सप्रेस**

**गंगापूर/ प्रतिनिधी/** गंगापूर तालुक्यातील तांदुळवाडी येथे उमेद अभियान च्या माध्यमातून व ग्रामोदय प्रकल्पाच्या सहकार्याने शेतकरी महिला समूहांना मधुमक्षिका पालन पेट्याचे वितरण नुकतेच जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणे प्रकल्प संचालक तथा अतिरिक्त उपमुख्यकार्यकारी अधिकारी अशोक सिरसे , सहाय्यक गट विकास अधिकारी श्री भालेकर, माजी सभापती गंगापूर च्या सौ ज्योतिताई गायकवाड, उमेद अभियान चे प्रमुख झाल्टे ,अविनाश गायकवाड, श्री प्रमोद कांबळे, मोगल बँक ऑफ महाराष्ट्र स्वयंरोजगार प्रशिक्षण केंद्राचे संपत शेजुळ या मान्यवरांच्या हस्ते उद्घाटन करून पेट्याचे वाटप करण्यात आले.

त्यात,वाळूज, शेंदूर्वादा, लासुर, व तुर्काबाद सर्कलमध्ये शेतकरी व महिला समूहांना राष्ट्रीय ग्रामीण जीवांनोत अभियान, भारत सरकार, राष्ट्रीय फलोत्पादन अभियान,कृषी आत्मा, महाराष्ट्र खादी ग्रामोद्योग मंडळ, आदींच्या योजनेतून २२ लक्ष रुपये मंजूर झाले असून चारशे शेतकऱ्यांची निवड करण्यात आली. त्यातील एक टप्पा जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या माध्यमातून तांदुळवाडी येथील गोदावरी मधुमक्षिका पालन उत्पादक शेतकरी महिला समूहांना पाच लक्ष रुपये खर्च करून मध पेट्याचे वितरण करण्यात आले.

त्यावेळी ते बोलत होते,कार्यक्रमाचे प्रास्ताविक संयोजक अविनाश गायकवाड यांनी केले.

तर सूत्रसंचालनव आभार अनिल कांबळे यांनी केले हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी पंचक्रोशीतील संदीप पाटील आकाश विधाते, सरला काकडे आदींनी केले.

# निवडणुकीच्या काळात मुंडेंना वाल्मिक कराडची आठवण

राज्याला हादरवणाऱ्या संतोष देशमुख हत्या प्रकरणातील आरोपी वाल्मिक कराडची माजी मंत्री धनंजय मुंडेंना आठवण आली. नगरपालिकेच्या निवडणुकीचा प्रचार करताना धनंजय मुंडे यांनी तसं वक्तव्यही केलं. आता त्याच वक्तव्यावरुन संतोष देशमुखांचे बंधू धनंजय देशमुखांनी मुंडेंवर टीका केली. चुकीची कामं बंद झाल्यामुळे आरोपी सहकाऱ्याची लोकप्रतिनिधींना उणीव भासते अशी टीका धनंजय देशमुखांनी केली.

बीडमधील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांची ९ डिसेंबर २०२४ रोजी हत्या करण्यात आली होती. या हत्येमागे खंडणीचे प्रकरण होते. धनंजय मुंडे यांचा जवळचा सहकारी वाल्मिक कराड आणि त्याच्या साथिदारांनी संतोष देशमुखांची क्रूर हत्या केली होती. या प्रकरणात वाल्मिक कराड आणि त्याच्या साथिदारांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

राज्याच्या पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे आणि माजी मंत्री धनंजय मुंडे यांच्या उपस्थितीत परळी नगरपरिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महायुतीचा भव्य कार्यकर्ता मेळावा मेळावा पार पडला. या मेळाव्यात बोलताना धनंजय मुंडे यांनी एक वक्तव्य केलं. 'गेल्या १० महिन्यांपासून बीडमध्ये जगमित्र कार्यालय सुरू आहे. पण आज इथे एक माणूस नाही' असं धनंजय मुंडे म्हणाले. यामुळे धनंजय मुंडे यांना उणीव भासत असलेला तो माणूस म्हणजे वाल्मिक कराड आहे अशी चर्चा सध्या बीडमध्ये रंगत आहे.

धनंजय मुंडे यांनी केलेल्या या वक्तव्यावर संतोष देशमुखांचे बंधू धनंजय देशमुखांनी टीका केली. ते म्हणाले की, एवढे दिवस ते अंग झटकत होते, या प्रकरणाचा आणि माझा काही संबंध नाही, हे प्रकरण मला माहीत नाही असं म्हणत होते. पण आताच्या त्यांच्या भूमिकेवरुन त्यांना सगळ्या गोष्टीची जाण असल्याचं स्पष्ट होतंय. ही गोष्ट जाणीवपूर्वक नाही तर गांभीर्यानं बोलली गेली आहे. त्यांचे ते सगळे सहकारी चुकीची कामं करायची, खंडणी गोळा करायचे. या सगळ्या चुकीच्या गोष्टींची स्पष्टोक्ती या लोकप्रतिनिधींनी दिली. ते यांच्या एवढे जवळचे आहेत की, चुकीची कामं करुनही त्यांना उणीव भासत आहे.

ज्यांनी पाप केलं त्यांना शिक्षा मिळणारच. एका निष्पाप माणसाला संपवलं यावर जास्त चर्चा न करता, एक आरोपी कसा गुंतला, त्याची उणीव कशी भासते याची त्यांना जास्त चिंता आहे असं धनंजय देशमुख म्हणाले.दरम्यान, गेल्या वर्षभरात परळीची बदनामी झाली असून काय चुकलं, काय नाही हे न्यायालय ठरवेल असही धनंजय मुंडेंनी म्हटलं. वाल्मिक कराडचं नावं मुंडेंनी घेतलं नसलं तरीही नगरपरिषदेच्या निवडणुकीत धनंजय मुंडेंना कराडची उणीव भासत असल्याची जोरदार चर्चा आहे.

# महाराष्ट्राचे भाग्यविधाते यशवंतराव चव्हाण

महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री राष्ट्रीय राजकारणातले द्रष्टे नेते स्वर्गीय यशवंतराव चव्हाण यांचा आज स्मृतिदिन. यशवंतराव चव्हाण यांचा जन्म १२ मार्च १९१३ रोजी सातारा जिल्ह्यातील देवराष्ट्रे या छोट्याशा गावातील एका सामान्य शेतकरी कुटुंबात झाला. त्यांचे प्राथमिक शिक्षण कराड येथे झाले तर उच्चशिक्षण कोल्हापूर व पुणे येथे झाले. पुण्यात त्यांनी बीए - एलएलबीचे शिक्षण पूर्ण केले.

महात्मा गांधीजींच्या स्वातंत्र्याच्या आंदोलनाने प्रेरित होऊन त्यांनी स्वातंत्र्य संग्रामात भाग घेतला. १९३० साली त्यांनी महात्मा गांधीजींच्या सविनय आंदोलनात भाग घेतला. १९३२ साली त्यांना तुरुंगवास भोगावा लागला. १९४२ च्या चले जाव आंदोलनातही त्यांनी भाग घेतला. सातारा जिल्ह्यातील भूमिगत चळवळीतही त्यांनी महत्वाची भूमिका बजावली. १९४६ सालच्या मुंबई प्रांताच्या विधिमंडळ निवडणुकीत दक्षिण सातारा मतदारसंघातून ते निवडले गेले आणि आणि संसदीय मंडळाचे चिटणीस बनले. १९४८ साली यशवंतरावांची काँग्रेसच्या चिटणीस पदावर निवड झाली. १९५२ च्या निवडणुकीनंतर ते स्थानिक स्वराज्य संस्था व पुरवठा खात्याचे मंत्री बनले.

द्विभाषिक राज्याचे मुख्यमंत्री म्हणून त्यांनी १ नोव्हेंबर १९५६ रोजी सूत्र हाती घेतले. संयुक्त महाराष्ट्राचे स्थापना झाल्यावर ते महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री बनले. १ मे १९६० रोजी त्यांनी महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली. मुख्यमंत्री असताना त्यांनी राज्यातील अनेक उपक्रमांना चालना दिली. महाराष्ट्राच्या विकासाची मुहूर्तमेढ त्यांनी रोवली म्हणूनच त्यांना महाराष्ट्राचे भाग्यविधाते म्हणतात. १९६२ साली चीनने भारतावर आक्रमण केले.

देशाचे सार्वभौमत्व धोक्यात आले अशावेळी तत्कालीन पंतप्रधान पंडित नेहरू यांनी यशवंतराव चव्हाण यांना दिल्लीत बोलावून त्यांची देशाच्या संरक्षणमंत्री नेमणूक केली. परकीय आक्रमणाच्या वेळी देश संकटात असताना हा सह्याद्री हिमालयाच्या मदतीला धावून गेला. चिनी आक्रमणानंतर संरक्षण दलात चैतन्य आणण्याची जबाबदारी त्यांनी यशस्वीरित्या पेलली.

१९६७ सालच्या निवडणुकीत अनेक राज्यात काँग्रेसचा पराभव झाला. त्याकाळात देशात अस्थिर परिस्थिती निर्माण झाली होती. त्या परिस्थितीत त्यांनी गृहखाते यशस्वीरित्या सांभाळले. अर्थमंत्री म्हणूनही त्यांची कारकिर्द गाजली. बांगलादेशचे युद्ध, दुष्काळ यामुळे खालावलेल्या देशाच्या अर्थव्यवस्थेला त्यांनी चालना दिली. संस्थानिकांचे तणखे रद्द करणे, बँकांचे राष्ट्रीयकरण करणे यासारखे महत्वाचे निर्णय ते अर्थमंत्री असतानाच घेतले गेले. चलनवाढीला आळा घालण्यासाठी कडक उपाययोजना करण्याचे धोरण देखील त्यांच्याच काळात आखण्यात आले. देशाचे परराष्ट्र मंत्री म्हणूनही त्यांनी काही काळ काम केले. पुढील काळात देशाच्या उपपंतप्रधानपदाची जबाबदारीही त्यांनी यशस्वीरित्या सांभाळली. देशात जनता पक्षाचे सरकार असताना ते विरोधी पक्षनेते होते. आठव्या वित्त आयोगाचे अध्यक्ष म्हणूनही त्यांनी काम केले.

महाराष्ट्राचे भाग्यविधाते, कार्यक्षम मंत्री, उत्तम संसदपटू, उदारमतवादी नेते अशी जनमानसात त्यांची प्रतिमा निर्माण झाली. महाराष्ट्राच्या गौरवशाली इतिहासात त्यांनी मानाचा तुरा रोवला. महाराष्ट्राच्या या सुपुत्राने देशातच नव्हे, तर जगात महाराष्ट्राचे नाव उज्ज्वल केले.

यशवंतराव जितके महान नेते होते तितकेच ते अभिजात साहित्यिकही होते. ललित, आत्मचरित्र, चरित्रात्मक लेख, व्यक्तिचित्रणपर लेख, प्रवासवर्णन, स्फूटलेखन, वैचारिक लेख, समीक्षात्मक लेख, पत्रलेखन भाषणे, इत्यादी स्वरूपात त्यांनी विपुल लेखन केले आहे.

त्यांच्या कृष्णाकाठ, ऋणानुबंध, युगांतर, भूमिका, शिवनेरीच्या नौबती, विदेश दर्शन, सह्याद्रीचे वारे या ग्रंथातून त्यांच्या लेखन प्रतिभेचा परिचय होतो. ते जरी राजकारणी असले तरी त्यांच्यामधील चिंतनशील रसिक, सामाजिक विचारवंत हा मात्र साहित्याबरोबरच राहिला होता. त्यांच्या सर्व कलाकृती लक्षवेधक आहेत.

यशवंतराव चव्हाण हे खऱ्या अर्थाने लोकनेते होते.

भारतीय राजकारतील त्यांचे योगदान अद्वितीय असेच आहे. महाराष्ट्रासाठी तर त्यांचे योगदान अनमोल असेच आहे. महाराष्ट्र त्यांचे योगदान कधीही विसरू शकत नाही. २५ नोव्हेंबर १९८४ रोजी त्यांचे निधन झाले. आज त्यांच्या स्मृतिदिनी त्यांचे स्मरण करणे हे आपले कर्तव्यच आहे. महाराष्ट्राचे भाग्यविधाते यशवंतराव चव्हाण यांना स्मृतिदिनी विनम्र अभिवादन!

**- श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**

# अहिल्यानगरच्या मातीतील 'हमसफर' लघुपटाचा इफ्फीमध्ये गौरव, उद्योजक नरेंद्र फिरोदिया यांची निर्मिती

**आत्ताच एक्सप्रेस**
**गोवा ( पणजी ) हर्षदा वेदपाठक /** गोव्यातील आंतरराष्ट्रीय फिल्म फेस्टिव्हलमध्ये देश-विदेशातील लघुपट, चित्रपट दाखविण्यात (IFFI) आले आहेत. यात अहिल्यानगरच्या मातीत तयार झालेल्या हमसफर लघुपटाचे स्क्रिनिंग करण्यात आले आहे. हा लघुपट हा मूकपट आहे. ज्येष्ठ अभिनेते विजय पाटकर, अहिल्यानगरमधील कलाकारांचा अभिनयाला जोरदार दादही मिळाली.हमसफर लघुपटाची इंडियन पानोरोमा सेक्शनमध्ये निवड झाली होती. या सोहळ्यात लघुपटाचे निर्माते नरेंद्र फिरोदिया, दिग्दर्शक अभिजीत दळवी, को-प्रोड्यूसर राखी फिरोदिया यांना इफ्फीकडून प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले आहे. याबाबत उद्योजक व लघुपटाचे निर्माते नरेंद्र फिरोदिया म्हणाले, आमच्यासाठी हा वेगळा अनुभव होता. इफ्फीमध्ये येऊन गर्व वाटतो. हमसफर अहिल्यानगरचा लघुपट आहे. इंडियन पेनोरोमामध्ये आम्हाला इंट्री मिळाली. संपूर्ण इफीचा अनुभव चांगला आहे. फार वेगळं वाटलं. मी इफीचे आभार मानतो. (Short film "Humsafar' from -hilyanagar soil wins honour at IFFI, produced by Narendra Firodia)

**हा चित्रपट हसवतो आणि डोळ्यात पाणीही आणतो-नरेंद्र फिरोदिया**



माझी कर्मभूमी व जन्मभूमी अहिल्यानगरची आहे. ज्येष्ठ अभिनेते विजय पाटकर हे सोडली तर उर्वरित कलाकार हे अहिल्यानगरचे होते. या संपूर्ण लघुपटात डायलॉग नाहीत. आहे. ही सायलेंट फिल्म आहे. आपल्या मातीतील कलाकार स्टेज मिळविण्यासाठी धडपड असतात.

अहिल्यानगर करंडकची निर्मिती त्यासाठीच झाली आहे. अनुष्का मोशन पिक्चर्स, अहिल्यानगर फिल्म कंपनीचा एकच उद्देश आहे, आपल्या मातीतील कलाकारांना संधी मिळाली पाहिजे. तुम्हाला चित्रपट हसवतो आणि तुमच्या डोळ्यातही पाणी आणतो. विजय पाटकरसारखे चांगला अभिनेते आम्हाला मिळाले आहेत. दादासाहेब फाळके पुरस्कार दोनदा मिळाला आहे. इफ्फीमध्ये आम्ही दोनदा आलो आहे. आमच्या कलाकृती बर्लिन आणि ऑस्करपर्यंत जाईल, याची खात्री असल्याचे फिरोदिया यांनी सांगितले.चित्रपटाचे दिग्दर्शक अभिजित दळवी म्हणाले, हमसफर व भेळ या लघुपटाची थीम ही नरेंद्र फिरोदिया यांच्या कल्पनेतून आली आहे. हा हमसफर लघुपट इफीमध्ये आला आहे. विजय पाटकर यांना ही स्क्रीप्ट खूप आवडली होती. विजय पाटकर यांनी लिलया अभिनय केलाय. आता झारखंड आंतरराष्ट्रीय फिल्म फेस्टिव्हल बेस्ट ॲक्टर पुरस्कार त्यांना मिळाला आहे.

**अनुष्का मोशन पिक्चर्स अँड एंटरटेन्मेंटची प्रस्तुती**

उद्योजक नरेंद्र फिरोदिया यांच्या अनुष्का मोशन पिक्चर्स अँड एंटरटेन्मेंटची प्रस्तुती असणारा हा लघुपट आहे. या लघुपटात मुख्य भूमिका अभिनेते विजय पाटकर यांची आहे. तर अभिजित दळवी यांनी लघुपट दिग्दर्शित केलाय.

# जागे व्हारे सारेजण....करा करा मतदान.....या कवितेच्या माध्यमातून मतदार जनजागृती

**आत्ताच एक्सप्रेस**
**जिंतूर (प्रतिनिधी)** दिनांक २२ नोव्हेंबर रोजी जिंतूरच्या शहरी भागात गर्दी असलेल्या ठिकाणी, चौकाचौकात व विशेषतः मतदानाची टक्केवारी कमी असलेल्या भागामध्ये स्वीप पथकाने घोषणा, कविता, गीतगायनाद्वारे मतदार जनजागृती केली. निवडणूक आयोग यांच्या निर्देशानुसार जिल्हाधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी संजयसिंह चव्हाण, उपविभागीय अधिकारी सेलू तथा निवडणूक निर्णय अधिकारी जिंतूर नगर परिषद शैलेश लाहोटी, तहसीलदार जिंतूर सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी राजेश सरवदे, मुख्याधिकारी उमेश ढाकणे, उपमुख्याधिकारी अनिल समिंद्रे, नायब तहसीलदार निवडणूक सुग्रीव मुंढे, मिडिया पथक प्रमुख नायब तहसीलदार प्रशांत राखे, गटशिक्षणाधिकारी तथा मतदान जनजागृती पथक प्रमुख त्र्यंबक पोले यांच्या नियोजनानुसार मतदार जनजागृती कार्यक्रम सुरू करण्यात आला आहे. मतदार जनजागृती अभियान यासाठी भोंगा व जनजागृती बॅनर असलेले फिरते वाहन तयार करण्यात आले आहे. या वाहनाच्या माध्यमातून जिंतूर नगर परिषदेच्या विविध भागांमध्ये मतदार जनजागृती पथकाद्वारे जनजागृती केली जात आहे. मतदारांनी आपल्या मतदानाचा हक्क बजावावा या संदर्भात प्रबोधन केले जात आहे. विविध घोषणा, गीते, कविता या माध्यमातून मतदारांना मतदान करण्यासाठी प्रेरित केल्या जात आहे. लोकशाही बळकट आणि सक्षम करण्यासाठी निवडणुकीतील मतदान प्रक्रियेत मतदारांचा जागरूकतेने उत्स्फूर्त मोठ्या सहभागाला विशेष महत्त्व आहे. प्रत्येक निवडणुकीत सर्व मतदारांनी जागरूकतेने आपला मतदानाचा हक्क बजावला पाहिजे. जागरूक मतदार लोकशाही बळकट करतात. सक्षम लोकशाहीमध्ये मतदानाची टक्केवारी प्रचंड मोठी असते. मतदानाचा दिवस उत्सवासारखा साजरा केला जातो.




त्याप्रमाणे जिंतूर नगरपरिषद क्षेत्रातील सर्व मतदारांनी उत्सव लोकशाहीचा, अभिमान देशाचा अशी भावना मनात ठेवून दिनांक ०२/१२/२०२५ रोजी सकाळी ०७:३० ते संध्याकाळी ०५:३० या वेळेत मतदान केंद्रावर जाऊन मतदान करावे अशा प्रकारचे प्रबोधन तालुकास्तरीय मतदार जनजागृती व सहभाग कार्यक्रमाचे पथक सदस्य राजेंद्र ढाकणे, दिनकर घुगे, मारोती घुगे, प्रवीण घुले, लक्ष्मण टाकणसार, हनुमान गायकवाड, योगेश देशमुख यांनी केले.

स्वीप पथकातील सदस्य आणि साहित्यिक मयूर जोशी यांनी

(ताई, माई, बाई, अक्का
जागे व्हा रे सारे जण
दादा, भाऊ, मामा, काका
करा करा मतदान....)

या आशयगर्भ स्वरचित कवितेच्या माध्यमातून मतदार जनजागृती करण्याचा प्रयत्न केला. स्वीप पथकातील सदस्य राजेंद्र ढाकणे यांनी मतदारांना मतदान करण्या बाबतची प्रतिज्ञा घेतली.जिंतूरच्या नगर परिषद भागात चुनाव पाठशाळा, चौकाचौकात लोकशाही गप्पा, पथनाट्य याद्वारे स्वीप पथकाने मतदार जनजागृती केली.

# आष्टी-पाथरी रोडवरील अवैध चोरटी देशी दारू वाहतूक उधळली

**आताच एक्सप्रेस**
**कोकाटे हादगाव / सोपान वाघमारे/** आष्टी पोलीस ठाण्याच्या पथकाने २० नोव्हेंबर रोजी संध्याकाळी सुमारे पाच ते सहा वाजताच्या दरम्यान अवैध देशी दारू वाहतूक करणाऱ्या दोन संशयित इसमांवर अत्यंत नेमकी व वेळेवर कारवाई करून मोठा मुद्देमाल जप्त केला. गुप्त माहितीच्या आधारे करण्यात आलेल्या या सापळा कारवाईमुळे अवैध दारू वाहतूक करणाऱ्या टोळीला मोठा धक्का बसला आहे.



**गुप्त माहिती मिळताच कारवाईची चक्रे वेगाने फिरली**

**पोलिसांची धडाकेबाज कारवाई**

पोलीस अंमलदार गायके यांना त्यांच्या गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की मौजे रायगव्हाण-फुलवाडी रोडने एका डिस्कव्हर मोटारसायकलवरून दोन इसम देशी दारूची चोरटी वाहतूक करत आहेत. ही माहिती मिळताच अंमलदार गायके यांनी तात्काळ ही बाब प्रभारी अधिकारी सपोनि गणेश सुरवसे यांना कळवली.त्यांच्या आदेशानुसार तातडीने एक पथक तयार करण्यात आले. या पथकात पोलीस अंमलदार गायके,पोकॉ.पांढरे, पोकों बादाडे,अशा अधिकाऱ्यांचा समावेश होता. पथकाने खाजगी वाहनातून दिलेल्या ठिकाणी तत्काळ धाव घेतली.

प्रत्यक्ष कारवाई: मोटारसायकल थांबवून दारू जप्त

आष्टी-पाथरी मार्गावर फुलवाडी रोडजवळ पोहोचताच पथकाला एक डिस्कव्हर मोटारसायकल येताना दिसली. दुचाकीवर दोन व्यक्ती बसल्या होत्या आणि त्यांच्या जवळ पांढऱ्या-निळ्या रंगाची एक मोठी पिशवी असल्याचे दिसले. पथकाने त्यांना ताब्यात घेत पिशवीची तपासणी केली असता खालील मुद्देमाल आढळून आला.

जप्त मालमत्ता

२१ देशी संत्रा भिंगरी कंपनीच्या काचेच्या बाटल्या,डिस्कव्हर मोटारसायकल यांची एकूण किंमत ६२,१०० इतकी होती.भारताच्या महाराष्ट्र दारूबंदी कायदा अन्वये अशा प्रकारे दारूची वाहतूक करणे हा गंभीर गुन्हा मानला जात असल्याने दोन्ही संशयितांना ताब्यात घेण्यात आले.

गुन्हा नोंद - कलम ६५(अ)(ई), ८३ दारूबंदी अधिनियम या प्रकरणी पोलीस अंमलदार गायके यांनी आष्टी पोलीस ठाण्यात कलम ६५ (अ) (ई), ८३ महाराष्ट्र दारूबंदी कायदा अन्वये गुन्हा नोंदवला आहे. पुढील तपास पोहेकों गायके हे करत आहेत.

उच्च अधिकार्यांच्या मार्गदर्शनाखाली केलेली नेमकी व अचूक कारवाई

ही कारवाई खालील वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली पार पाडण्यात आली पोलीस अधीक्षक - अजयकुमार बंसल,अप्पर पोलीस अधीक्षक - आयुष नोपाणी,उपविभागीय पोलीस अधिकारी, परतुर रेंजे,प्रभारी अधिकारी सपोनि गणेश सुरवसे, पोउपनि अजित चाटे, ग्रेड पोउपनि कांदे, पोहेकों गायके, पोशि राणुजी पांढरे, पोशि डिगांबर बादाडे आणि त्यांच्या पथकाने अत्यंत समन्वयाने व धाडसाने ही कारवाई पूर्ण केली.

**महत्त्वाचा संदेश**

या कारवाईतून अवैध मद्य व्यापाराविरुद्ध पोलिसांची शून्य सहनशीलतेची भूमिका पुन्हा अधोरेखित झाली आहे. ग्रामीण भागात वाढत चाललेल्या अवैध दारू वाहतुकीला आळा घालण्यासाठी पोलिसांनी केलेला हा प्रयत्न प्रशंसनीय मानला जात आहे.आपल्याला हवे असल्यास मी या बातमीचे हेडलाइन पर्याय,संक्षिप्त बुलेटिन, किंवा सोशल मीडिया पोस्ट देखील तयार करून देऊ शकतो.

# महापालिका अधिकाऱ्यांचा अहंकार नडणार!

## मुंबई उच्च न्यायालयाच्या निकालाने मनमानी कारभाराला लगाम

**आत्ताच एक्सप्रेस**
**जिंतूर (प्रतिनिधी)** खासगी आपसातील वाद मिटवण्यासाठी किंवा एका पक्षाला फायदा पोहोचवण्यासाठी महापालिका यंत्रणेचा वापर करता येणार नाही, असा महत्त्वपूर्ण निकाल मुंबई उच्च न्यायालयाने दिला आहे. पुणे महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांनी कोणताही कायदेशीर आधार नसताना आणि योग्य प्रक्रियेचे पालन न करता घिसाडघाईने दिलेली 'काम थांबवा' नोटीस रद्द करताना न्यायालयाने अधिकाऱ्यांच्या मनमानी, घाईघाईच्या आणि उद्दाम कृतीवर तीव्र ताशेरे ओढले आहेत. या निकालामुळे शासकीय अधिकाराचा गैरवापर करणाऱ्यांना जबर चाप बसला आहे.सदर प्रकरणी न्यायमूर्ती जी.एस. कुलकर्णी आणि न्यायमूर्ती आरिफ एस. डॉक्टर यांच्या खंडपीठासमोर मे. ॲट्रिया कन्स्ट्रक्शन्स आणि राजगृही रेसिडेन्सीमधील फ्लॅट खरेदीदारांनी दाखल केलेल्या याचिकांवर सुनावणी झाली. विकासक आणि मूळ मालक यांच्यातील वादामधून ही नोटीस बजावण्यात आली होती. न्यायालयाने म्हटले की, ही 'काम थांबवा' नोटीस कोणत्याही कायदेशीर प्रक्रियेचे पालन न करता, जागेची पाहणी न करता किंवा नोंदींची पडताळणी न करता, केवळ काही अज्ञात व्यक्तींच्या तक्रारीवरून जारी करण्यात आली होती.या निकालावर प्रतिक्रिया देताना नोटरी असोसिएशनचे कार्याध्यक्ष ड. महेश एस. धनावत यांनी म्हटले की, उच्च न्यायालयाचा हा निर्णय म्हणजे अधिकाराच्या अहंकारात बुडालेल्या आणि कायद्याला स्वतःच्या सोयीनुसार वाकवणाऱ्या अधिकाऱ्यांच्या मनमानी कारभारावर उगारलेला कायदेशीर आसूड आहे. पुणे महापालिकेच्या कृतीतून जालना महानगरपालिकेसह राज्यातील इतर सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांनी धडा घेतला पाहिजे. आता अधिकाऱ्यांचा अहंकार आणि सत्तेचा गैरवापर खपवून घेतला जाणार नाही.धनावत पुढे म्हणाले, लवाद कायद्यांतर्गत कायदेशीर प्रक्रियेत अपयशी ठरल्यानंतर, वेलबिल्ड कंपनीने महापालिका यंत्रणेचा गैरवापर करून जे साध्य करण्याचा प्रयत्न केला, ते न्यायालयाने अचूक हेरले. जे कायदेशीर मार्गाने मिळू शकले नाही, ते महापालिकेच्या अधिकाऱ्यांना हाताशी धरून मिळवण्याचा हा प्रकार होता. अशा प्रवृत्तींना आळा घालणे आवश्यक आहे. आचार्य चाणक्य यांनी शतकांपूर्वीच सांगितले आहे की:अर्थात, अन्यायाने मिळवलेली सत्ता किंवा संपत्ती फार काळ टिकत नाही; अकराव्या वर्षी ती मुळासकट नष्ट होते. हाच न्याय अधिकाराचा गैरवापर करणाऱ्यांना लागू होतो.न्यायालयाने आपल्या आदेशात स्पष्ट केले की, कोणत्याही वैधानिक प्राधिकरणाने असा कोणताही आदेश देण्यापूर्वी, ज्यामुळे एखाद्या पक्षाच्या नागरी हक्कांचे उल्लंघन होते, त्यांना योग्य कारणे दाखवा नोटीस देणे, त्यावर उत्तर देण्याची संधी देणे आणि सुनावणी घेणे बंधनकारक आहे. या प्रकरणात, कोणतीही कारणे दाखवा नोटीस न देता, केवळ व्हॉट्सपवर सुनावणीची सूचना देऊन दुसऱ्याच दिवशी 'काम थांबवा' नोटीस बजावण्यात आली, ही कृती कायद्याचे सरळसरळ उल्लंघन आहे.या गंभीर प्रकरणाची दखल घेत, उच्च न्यायालयाने महापालिका यंत्रणेचा गैरवापर केल्याबद्दल वेलबिल्ड मर्चंट्स प्रा. लि. कंपनीला २५ लाख रुपयांचा जबर दंड ठोठावला आहे. तसेच, बेकायदेशीर नोटीस जारी करणाऱ्या संबंधित महापालिका अधिकाऱ्यांना संयुक्तपणे ५ लाख रुपयांचा दंड ठोठावला आहे. या अधिकाऱ्यांच्या वर्तनाची चौकशी करून कारवाईचा अहवाल सादर करण्याचे निर्देशही न्यायालयाने महापालिका आयुक्तांना दिले आहेत.

## संक्षिप्त

### मोहम्मद मौज़म मोहम्मद आज़म यांचे दुःखद निधन

**आत्ताच एक्सप्रेस**

**खुलताबाद/प्रतिनिधी**/खुलताबाद शहरातील गुलाबशाह कॉलोनी येथे राहणारे ज्येष्ठ नागरिक मोहम्मद मौज़म मोहम्मद आझम (वय ७०) यांचे रविवारी (ता. २३) अल्प आजाराने दुःखद निधन झाले. गेल्या काही दिवसांपासून त्यांची तब्येत बिघडलेली होती.



उपचारादरम्यान त्यांनी अखेरचा श्वास घेतल्याची माहिती कुटुंबीयांनी दिली. त्यांच्या निधनाने परिसरात हळहळ व्यक्त केली जात असून, त्यांना शांत स्वभाव, धार्मिक आचरण आणि समाजातील विविध उपक्रमांत सक्रिय सहभागासाठी ओळखले जात होते.

त्यांची नमाजे-जनाजा शहरातील प्रसिद्ध धार्मिक स्थळ दरगाह बाबा बुरहानोद्दीन औलिया रह.येथे मोठ्या शोकमंडळाच्या उपस्थितीत अदा करण्यात आली. स्थानिक नागरिक, समाजातील मान्यवर, नातेवाईक आणि मित्रपरिवार यांनी उपस्थित राहून दिवंगत आत्म्यास श्रद्धांजली अर्पण केली.

त्यांच्या पश्चात पत्नी,चार मुली, दोन मुलं असा मोठा परिवार आहे. कुटुंबातील सर्व सदस्य आपल्या आपुलकी, सौजन्य आणि सामाजिक कार्यासाठी ओळखले जातात. मोहम्मद मौज़म हे दरगाह कमिटी हद्दे सुव्वमचे माजी अध्यक्ष मोहम्मद असलम यांचे वडील होते. त्या नात्याने त्यांची समाजात चांगली ओळख होती आणि विविध धार्मिक व सामाजिक कार्यक्रमांत त्यांचा मोलाचा सहभाग असे.दफनविधी सुलीभंजन येथील हजरत शाह जलालुद्दीन गंजेरवा यांच्या दरगाह परिसरात संध्याकाळी पाच वाजता पार पडला. दफनस्थळी मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते. त्यांच्या निधनाने परिसरात शोककळा पसरली असून, अनेकांनी कुटुंबीयांशी संपर्क साधून शोकसंवेदना व्यक्त केल्या.अल्लाह तआला दिवंगत आत्म्यास जन्नतुल फिरदौस मेठो आणि परिवाराला सब्र देओ, अशी सर्वत्र प्रार्थना करण्यात येत आहे.

### शिबगाट येथील लक्ष्मीबाई चव्हाण यांचे निधन

आत्ताच एक्सप्रेस



कन्नड /प्रतिनिधी/तालुक्यातील शिबगाट येथील प्रतिष्ठित गृहिणी कै. गं. भा. लक्ष्मीबाई नारायण चव्हाण यांचे दुखद निधन रविवारी रात्री साडेएका वाजता झाले. त्यांच्या निधनामुळे गावातील समाज, नातेवाईक आणि मित्रपरिवारात शोककळा पसरली आहे.त्यांच्यावर सोमवारी सकाळी १० वाजता शिबगाट येथील घराजवळ अंत्यसंस्कार करण्यात आले. अंत्यसंस्कार सोहळ्यात मोठ्या संख्येने गावकरी, नातेवाईक, मित्र आणि परिचित उपस्थित होते. लोकांनी त्यांच्या स्मरणार्थ श्रद्धांजली अर्पण केली व त्यांच्या जीवनातील आठवणींना उजाळा दिला.

लक्ष्मीबाई चव्हाण यांचा पती, तीन मुली आणि एक मुलगा असून त्यांच्याबरोबर अनेक नातवंडे आणि जवाई असून संपूर्ण कुटुंब या दुःखद घटनेने दुःखी आहे. त्यांनी आपले जीवन कुटुंबासाठी आणि समाजासाठी समर्पित केले होते. त्यांच्या सेवाभावी स्वभावामुळे शेजारी, नातेवाईक आणि गावातील लोकांमध्ये त्यांचे आदराचे स्थान होते.शिबगाट येथील स्थानिक समाज तसेच परिचित व्यक्तींच्या आठवणींमध्ये लक्ष्मीबाई चव्हाण यांचे योगदान सदैव स्मरणात राहणार आहे. त्यांच्या आत्म्यास शांती लाभो, अशी सर्वत्र प्रार्थना व्यक्त केली जात आहे.

# गंगापूर ज्ञानप्रबोधिनी शाळेत शिक्षकाची विकृती विद्यार्थीनीशी अश्लील वर्तनाचा प्रकार

**आत्ताच एक्सप्रेस**

**गंगापूर / प्रतिनिधी** / गंगापुर शहरातील ज्ञानप्रबोधिनी पब्लिक स्कूल नृसिंह कॉलनी येथे घडलेली घटना संपूर्ण शहराला हादरवून टाकणारी ठरली आहे. अल्पवयीन विद्यार्थीनीशी शिक्षकाने केलेल्या कथित अश्लील वर्तनामुळे पालक, शाळा प्रशासन आणि नागरिकांमध्ये तीव्र संतापाची लाट उसळली आहे.२१ नोव्हेंबर रोजी दुपारी शाळेच्या मधल्या सुट्टीदरम्यान विद्यार्थिनी वर्गात एकटी बसून जेवण करत होती. यावेळी शाळेतील शिक्षक राहुल बळीराम चव्हाण यांनी वर्गात प्रवेश करून तिच्या फ्रॉकमध्ये हात घालून छाती दाबल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. मुलगी धक्क्यात गेली आणि तिने ही माहिती घरच्यांना सांगितल्यानंतर प्रकरणाची माहिती पालकांपर्यंत पोहोचली.

**ही घटना उघडकीस आल्यापासून संपूर्ण गंगापुरात संतापाचे वातावरण आहे. सामाजिक संस्थांनी, स्थानिक नागरिकांनी आणि पालकांनी अशा प्रकारच्या घटना रोखण्यासाठी कठोर उपाययोजना करण्याची मागणी केली आहे. शाळांमधील शिक्षकांची पडताळणी, विद्यार्थिनींची सुरक्षा आणि अंतर्गत तक्रार निवारण यंत्रणा प्रभावी करण्याबाबतही चर्चा सुरु आहे.**

**पालकांचा रोष**

दरम्यान, २३ आणि २२ तारखेला शाळेला सुट्टी असल्याने पालक थेट २४ नोव्हेंबर रोजी शाळेत आले. मुलीच्या कथनावर संतप्त झालेल्या पालकांनी व काही शिक्षकांनी एकत्रितपणे आरोपी शिक्षकाला पकडत चोप केल्याची माहिती समोर आली आहे. हा प्रकार घडताच शाळेत मोठी गर्दी जमा झाली आणि शाळा परिसरात तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले.

**शाळा प्रशासनाची तातडीची कारवाई**

घटनेची गंभीरता ओळखून शाळा प्रशासनाने त्वरित हस्तक्षेप केला. कोणत्याही प्रकारचा विलंब न करता आरोपी शिक्षकाला गंगापूर पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आले. शाळा प्रशासनाने पालकांना शांत ठेवण्याचा प्रयत्न करत तपासात पूर्ण सहकार्य करण्याचे आश्वासन दिले आहे. शाळेतील सुरक्षाव्यवस्थेबाबत अनेक पालकांनी प्रश्न उपस्थित केले असून मुलांच्या सुरक्षिततेचा मुद्दा पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.



**पोलिसांचा तपास सुरू**

या गंभीर प्रकरणाची नोंद प्रभारी पोलीस निरीक्षक कुमारसिंग राठोड यांनी घेतली आहे. अल्पवयीन मुलीवर अत्याचाराचा आरोप असल्याने आरोपीवर झजउडज कायदा तसेच ट्रॉसिटी कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपासाचे मार्गदर्शन उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. निलेश पालवे करत आहेत. पोलिसांनी आरोपीची सखोल चौकशी सुरू केली असून घटनास्थळाचा पंचनामा, विद्यार्थिनीचे जाबाब, तसेच शाळेतील सीसीटीव्ही फुटेज (असल्यास) तपासले जाणार आहेत.

### कुराश आर्ट स्पर्धेत गौरव खैरे याने मिळविला जिल्ह्यातून प्रथम क्रमांक




**आत्ताच एक्सप्रेस**

**पैठण/विशेष प्रतिनिधी** / क्रीडा व युवक संचालनालय महाराष्ट्र राज्य, जिल्हा क्रीडा परिषद, जिल्हा क्रीडा अधिकारी बाजीराव देसाई छत्रपती संभाजीनगर यांच्या वतीने आयोजित क्रीडा संकुलन छत्रपती संभाजीनगर शालेय कुराश (मार्शल आर्ट) स्पर्धा घेण्यात आल्या. त्यामध्ये शंभूराजे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय पंढरीपिंपळगाव येथील शाळेतील गौरव अशोक खैरे रामनगर छत्रपती संभाजीनगर याने प्रथम क्रमांक पटकाविला.

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यामधील क्रीडा संकुलन छत्रपती संभाजीनगर येथे ही स्पर्धा पार पडली.रामनगर येथील चि. गौरव अशोक खैरे वय १७ वर्ष याने येथे झालेल्या १५ ते १८ या वयोगटात आपला प्रथम क्रमांक नोंदविला. रामनगर व पांढरी पिंपळगाव परिसरात गौरव चे अभिनंदन होत आहे. यापुढे होणाऱ्या जिल्हास्तरीय शालेय स्पर्धेत आपले ध्येय गाठण्यासाठी त्याला शाळेचे संचालक गजानन मोघे सर प्राध्यापक शरद शिंदे सर, कुराश आर्ट कोच बागवान, शालेय शिक्षक दसपुते, पाटील, शिंदे, वाघमारे, सवारे,व मांजरीकर मॅडम यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.या स्पर्धेत मुले व मुली मिळून जिल्ह्यातील अनेक विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.

### नादरपूर परिसरात कुष्ठरोग शोध सर्वेक्षणाला सुरूवात

**आत्ताच एक्सप्रेस**

**कन्नड/प्रतिनिधी**/कन्नड तालुक्यातील नाचनवेल-पिशोर-नादरपूर येथील प्राथमिक आरोग्य केंद्रांतर्गत कुष्ठरोग शोध सर्वेक्षण मोहीम सुरू करण्यात आली आहे. १७ नोव्हेंबर ते २ डिसेंबर या कालावधीत ही मोहीम राबवली जाणार आहे.

या सर्वेक्षणासाठी सहसंचालक-कुष्ठरोग विभाग डॉ.यांच्या



मार्गदर्शनाखाली तसेच प्राथमिक आरोग्य केंद्र नादरपूरच्या वैद्यकीय अधिकारी डॉ. सविता सुडके यांच्या नेतृत्वाखाली कार्य सुरू आहे.

मोहिम राबवण्यासाठी पिंपरखेडा, नादरपूर आदी गावांमध्ये आरोग्य कर्मचारी, आशा स्वयंसेविका यांच्या घराघरात जाऊन तपासणी सुरू आहे.पर्यवेक्षक संगीता जाधव यांच्या सहकार्याने आरोग्य पथक गावोगावी भेट देत नागरिकांची त्वचारोग, स्नायू सुन्नपणा इत्यादी लक्षणांची तपासणी करत आहे.कुष्ठरोगाचे रुग्ण लवकर शोधून त्यांच्यावर मोफत व योग्य उपचार करून समाजात जागृती निर्माण करण्याचे उद्दिष्ट या मोहिमेमागे आहे. मोहिम यशस्वी करण्यासाठी प्राथमिक आरोग्य केंद्रातील सर्व कर्मचारी आणि आशा स्वयंसेविका परिश्रम घेत आहेत.

# बालानगर महसूल मंडळाचे काम आणि अजून सहा महिने थांब

**आत्ताच एक्सप्रेस**

**पैठण/विशेष प्रतिनिधी** / बालानगर महसूल मंडळात ई-फेरफार प्रक्रियेतील होत असलेल्या विलंबामुळे नागरिकांना सातबारा उतारा व वारसनोंदीसाठी अक्षरशः महिनोन्महिने भटकंती करावी लागते, हे अतिशय गंभीर असून संपूर्ण प्रणालीतील दुरवस्थेचे निदर्शक आहे. महसूल विभागाने ई-फेरफार योजना सुरू करताना उद्दिष्ट स्पष्ट मांडले होते-मानवी हस्तक्षेप कमी करणे, भ्रष्टाचाराला आळा घालणे, वेळ वाचवणे आणि दस्तनोंदीनंतर एक महिन्याच्या आत खातेदारांच्या नोंदी अद्ययावत करून पारदर्शक सेवा उपलब्ध करून देणे. मात्र सध्याची परिस्थिती उलट दिशेने जात आहे.



ई-फेरफार योजनेमागचे मूळ तत्त्व

ई-फेरफार प्रणाली दस्तनोंदणी कार्यालयातून तलाठी कार्यालयात माहिती थेट ऑनलाइन पोहोचवते. तलाठींनी ती प्रणालीमध्ये स्वीकारायची, गरज असल्यास नोटीस काढून ती बजावायची आणि सर्व प्रक्रिया पूर्ण करून मंडळ अधिकाऱ्याकडे ऑनलाईन मंजुरीसाठी पाठवायचे. मंडळ अधिकाऱ्यांनीही मुदतीत निर्णय देणे बंधनकारक आहे.

ही प्रक्रिया यासाठी राबवली की-

* नागरिकांना फेरफारसाठी अर्ज, पुरावे, तोंडी विनंत्या किंवा वारंवार चकरा माराव्या लागू नयेत.
* दस्तनोंदीनंतर शेतकऱ्यांच्या नावावर जमीन तातडीने नोंद व्हावी.
* वारसनोंदी लवकर घेतल्या जाव्यात, जेणेकरून कर्ज, अनुदाने, पीकविमा यांसाठी कुणाला अडथळा येऊ नये.

**प्रत्यक्षात काय घडते आहे?**

प्रत्यक्षात बालानगर मंडळात उलट चित्र दिसत आहे-दस्तनोंदणी कार्यालयातून नोंद ऑनलाइन आली तरी तलाठी ती स्वीकारत नाहीत किंवा नोटीस वेळेत काढात नाहीत. काही वेळा नोटीस काढली तरी तिला बजावण्यात अनाकलनीय विलंब होतो. त्यानंतर मंडळ अधिकाऱ्यांकडे प्रस्ताव जातो; पण तेथेही तो प्रलंबित ठेवला जातो.

परिणामी,ज्या कामाला एक महिना पुरेसा आहे तेच काम सहा महिने, कधी वर्षभर प्रलंबित राहते.

नागरिक कितीही पाठपुरावा करत राहिले तरी सिस्टममध्ये प्रॉब्लेम आहे, थोडं थांबा, वरून ऑर्डर नाही अशा कारणांनी काम थांबवले जाण्याच्या तक्रारी मोठ्या प्रमाणावर आहेत.

**जाणूनबुजून केले जाणारे अडथळे खालील प्रकार वारंवार दिसत आहेत-**

१. तलाठीकडे नोंद येऊनही फेरफार न घेणे.

- डॅशबोर्डावर नोंद दिसत असतानाही ती स्वीकारण्यात येत नाही.

२. नोटीस वेळेत न काढणे किंवा न बजावणे.

- तांत्रिक कारणे, कर्मचारी अपूर्णता किंवा जाणूनबुजून टाळाटाळ.

३.मंडळ अधिकाऱ्यांकडून फाईल प्रलंबित ठेवणे.

- कोणताही आक्षेप नसतानाही मंजुरी न देणे, अनाकलनीय विलंब करणे.

**नागरिकांवर होणारे परिणाम**

-कर्ज, पीकविमा, सबसिडी मिळण्यात विलंब

-जमिनीच्या व्यवहारात अडथळे

-वारसनोंदी नसल्याने वारसांना हक्क सिद्ध करण्यात अडचणी

-मानसिक, आर्थिक व वेळेची मोठी हानी

**प्रशासनाने काय करणे आवश्यक आहे?**

महसूल खात्याने ई-फेरफारला विश्वसनीय बनवण्यासाठी कडक पावले उचलणे अत्यावश्यक आहे.

प्रलंबित फेरफारांचे सखोल ऑडिट

तलाठी व मंडळ अधिकाऱ्यांकडून कारणमीमांसा घेत स्पष्टीकरण मागणे. जाणूनबुजून विलंब करणाऱ्यांवर प्रशासकीय कारवाई

-नागरिकांसाठी तक्रार निवारण यंत्रणा अधिक प्रभावी करणे.

-फेरफाराची स्थिती नागरिकांना मोबाइलद्वारे पारदर्शकपणे दिसेल अशी ट्रॅकिंग प्रणाली सक्षम करणे.

सरकारने तयार केलेली चांगली योजना नागरिकांपर्यंत पोहोचावी यासाठी प्रणालीतील विलंब, निष्काळजीपणा आणि जाणूनबुजून केलेले अडथळे थांबवणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

ई-फेरफार ही योजना लोकांच्या विश्वासाचा प्रश्न आहे, आणि त्या विश्वासाला तडा जाऊ नये यासाठी प्रशासनाने तातडीने कार्यवाही करणे आवश्यक आहे.

# वंचित बहुजन आघाडीच्या फुलंब्री तालुकाध्यक्षपदी महेंद्र गडवे

**आत्ताच एक्सप्रेस**

**फुलंब्री /प्रतिनिधी**/वंचित बहुजन आघाडीच्या फुलंब्री तालुकाध्यक्षपदी महेंद्र गडवे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.फुलंब्री तालुक्यातील वानेगाव येथील महेंद्र गडवे यांची वंचित बहुजन आघाडी च्या तालुका पदाधिकारी वंचित बहुजन आघाडी चे राज्य नेते अमित भुईगळ यांच्या हस्ते करण्यात आली. पक्षाच्या आयोजित विशेष बैठकीत ही नियुक्ती जाहीर करण्यात आली. या बैठकीस पक्षाचे विविध पदाधिकारी उपस्थित होते. संघटन बांधणीतील त्यांचा सक्रिय सहभाग, समाजकारणातील




कामातली सातत्यपूर्ण भूमिका आणि पक्षनिष्ठा लक्षात घेऊन गडवे यांच्या नावावर वरिष्ठ पदाधिका-यांनी विश्वास व्यक्त केला. नियुक्तीनंतर महेंद्र गडवे यांनी दिलेल्या जबाबदारीचे प्रामाणिकपणे पालन करून पक्षाची ताकद तळागाळापर्यंत पोहोचवण्याचा निर्धार व्यक्त केला. गडवे यांच्या नियुक्तीचे परिसरातील नागरिक, कार्यकर्ते आणि पक्षश्रेष्ठींकडून अभिनंदन करण्यात येत असून तालुक्यात नव्या उर्जेची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.आगामी काळातील स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत जिल्हा परिषद व पंचायत समिति साठी उमेदवार देऊ अशी माहिती दैनिक आत्ताच एक्स्प्रेस प्रतिनिधी सरफराज पटेल यांच्या शी बोलताना महेंद्र गडवे यांनी सांगितले.

### धर्मनिरपेक्षता व सर्वांगीण विकासाचा मुद्दा महत्त्वाचा-अरविंद चव्हाण

**आत्ताच एक्सप्रेस/जालना (प्रतिनिधी)** जालना महानगरपालिकेच्या निवडणुकीत राष्ट्रवादी कॉंग्रेस अजित दादा पक्षाकडून सुशिक्षित व सामाजिक भान असणाऱ्या आणि सेवाभावी वृत्तीच्या कार्यकर्त्यांना पक्षाची उमेदवारी प्रदान करण्यासाठी इच्छुक उमेदवारांच्या उमेदवारी अर्जावर आज सोमवार रोजी जिल्हा पक्षकार्यालय येथे महत्त्वाची बैठकीत चर्चा करण्यात आली. जालना शहर जिल्हा राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाची सोमवार रोजी जिल्हा राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष तथा माजी आमदार अरविंदराव चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली पक्षातील इच्छुक उमेदवाराच्या उमेदवारी अर्जावर महत्त्वाच्या बैठकीत चर्चा करण्यात आली. याप्रसंगी राष्ट्रवादी कॉंग्रेस अजित दादा पक्षाचे उपाध्यक्ष तथा समन्वयक मधुकरराव अर्दड यांनी प्रमुख मार्गदर्शन केले. यावेळी जालना शहर जिल्हाध्यक्ष शेख मेहमूद यांनी जालना महानगरपालिका निवडणूक संदर्भात सविस्तर माहिती देऊन पुढील नियोजनाबद्दल अहवाल प्रस्तावित केला. बैठकीच्या अध्यक्षीय स्थानवरून चव्हाण यांनी बोलताना सांगितले की पक्षातील सक्रिय कार्यकर्ते व निवडून येण्याची क्षमता आणि सेवाभावी वृत्तीच्या या गोष्टीचा प्रामुख्याने विचार करून सर्व जाती धर्माच्या घटकांना संधी देण्याचा पुरेपूर प्रयत्न करण्यात येईल .

# नगराध्यक्ष पदाचे अर्ज दाखल करणारे शिवसेना शिंदे गटाच्या नेत्याने केला भाजपात प्रवेश

**आत्ताच एक्सप्रेस**

**फुलंब्री /प्रतिनिधी** / फुलंब्री शहर नगरपंचायत निवडणुकीच्या तोंडावर फुलंब्री आगामी फुलंब्री नगरपंचायत निवडणुकीत आज मोठा राजकीय उलटफेर घडला आहे.

शिवसेना (एकनाथ शिंदे) गटाचे नगराध्यक्ष पदाचे उमेदवार आनंदा किसन ढोके यांनी आपली नगराध्यक्ष पदाची उमेदवारी तसेच प्रभाग क्रमांक २ मधील पूजा आनंदा ढोके यांची उमेदवारी मागे घेत भाजपा पक्षात प्रवेश केला. या निर्णयामुळे शिंदे सेनेत मोठी खळबळ उडाली आहे.

या निवडणुकीत भाजपा आणि राष्ट्रवादी कॉंग्रेस (अजित पवार गट) एकत्र येऊन लढत आहेत, तर महाविकास आघाडी कॉंग्रेस, शिवसेना उभाठा आणि राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार गट यांच्या युतीने मैदानात आहे. शिंदेसेना १२ जागांवर स्वबळावर लढत होती. परंतु आतापर्यंत ६ उमेदवारांनी उमेदवारी मागे घेतल्यानंतर आज नगराध्यक्ष पदाचा उमेदवारही बाहेर पडल्यानंतर शिंदेसेना आता फक्त ४ जागांवरच लढत आहे.

आनंदा ढोके यांनी आज असंख्य कार्यकर्त्यांसह भाजपा जिल्हाध्यक्ष सुहास सिरसाठ यांच्या उपस्थितीत भाजपा पक्षात प्रवेश केला. प्रवेशानंतर त्यांना छत्रपती संभाजीनगर जिल्हा उपाध्यक्ष



पदी नियुक्त करण्यात आले.

स्थानिक नेत्यांकडून होणाऱ्या त्रासाला कंटाळून मी हे पाऊल उचलले असून फुलंब्रीच्या विकासासाठी भाजपा हा योग्य पर्याय असल्याचे ढोके यांनी पत्रकार परिषदेत सांगितले.

त्यांनी शिवसेनेला 'जय महाराष्ट्र' करत पक्षत्याग केला. या घडामोडीनंतर फुलंब्री निवडणुकीत भाजपाचे बळ अधिक मजबूत झाले असून राजकीय समीकरणे बदलण्याची चिन्हे दिसत आहेत. कार्यक्रमाला यौगेश मिसाळ, गणेश राऊत, सुमित प्रधान, वाल्मिक जाधव, सुदर्शन जाधव, गणेश तारू, संतोष आघाडे, चंद्रकांत राऊत, नवाब पटेल, सुनील शेवळे, नागेश भारद्वाज, पवन तिवारी, संतोष जाधव आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

# मोटार वाहन निरीक्षक आणि शासकीय चालकाने आपले कर्तव्य चोख पार पाडले

## उप प्रादेशिक परिवहन अधिकारी चंद्रमोहन चिंतल यांचा खुलासा

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना (प्रतिनिधी)** येथील उप प्रादेशिक परिवहन कार्यालयातील मोटार वाहन निरीक्षक अविनाश पाटील आणि शासकीय चालक भागवत परिसकर हे दोघे दि. २२ नोव्हेंबर, २०२५ रोजी कर्तव्यावर असतांना अग्रवाल चौक, जालना येथे ट्रक क्रमांक एमएच-२७ एक्स-१६५१ चे चालक यांनी उप प्रादेशिक परिवहन कार्यालयाचे वाहन दिसताच हाताने इशारा करून, त्यांना थांबविले. 'सकाळपासून माझ्या छातीत दुखत असुन, आता चक्कर येत आहे. तसेचव घाम येत आहे. कृपया मला जवळच्या दवाखान्यात घेऊन चला' असे संबंधीत ट्रक चालकाने अधिकाऱ्यांना सांगितले. ट्रकचालकासोबत असलेल्या मुलाने देखील अधिकाऱ्यांना त्याच्या वडिलांना तातडीने दवाखान्यात नेण्याची विनंती केली. चालकाची प्रकृती अत्यंत अस्वस्थ असल्याने, त्याला प्रचंड घाम, चक्कर, श्वासोच्छवासातील अडथळा आणि तीव्र अस्वस्थता अशी लक्षणे जाणवत असल्याचे अधिकाऱ्यांच्या निर्दर्शनास आले. ट्रक चालकाच्या मुलानेही त्यांच्या वडिलांना हृदयविकार आणि बी.पी. चा त्रास आधीपासून असल्याचे नमूद केले. वैद्यकीय उपचाराची तातडीची आवश्यकता ओळखून अधिकारी व चालक यांनी त्रेख्र डरारीळींरप मार्गदर्शक सूचना आणि मोटार वाहन कायदा कलम १३४- यानुसार आपले मानवी आणि कायदेशीर कर्तव्य बजावत त्यांना त्वरित वैद्यकीय मदत उपलब्ध करून देण्यासाठी रुग्णालयात पोहोचविण्यास मदत केली. ट्रक चालकास त्यांच्या मुलाच्या सहाय्याने शासकीय वाहनातून जिल्हा शासकीय रुग्णालय (घाटी), जालना येथे उपचारासाठी पोहोचविण्यात आले. रुग्णालयात पोहोचेपर्यंत चालक शुद्धीवर होता आणि तो व त्याचा मुलगा एकमेकांशी बोलत होते. त्यानंतर त्यांना शासकीय रुग्णालयात तातडीचे वैद्यकीय उपचार देण्यात आले.

या संपूर्ण कार्यवाहीची नोंद संबंधित पोलिस स्टेशनच्या स्टेशन डायरीमध्ये नियमित पद्धतीने करण्यात आलेली आहे. दरम्यान काही प्रसार माध्यमांमध्ये आणि वृत्तपत्रांमध्ये या घटनेची पूर्ण माहिती शासकीय रुग्णालय अधिकारी, पोलीस अधिकारी किंवा परिवहन कार्यालय यांच्या कोणत्याही पडताळणीशिवाय तथ्यहीन, आधारहीन आणि दिशाभूल करणारी माहिती प्रसारित केली जात आहे. प्रत्यक्षात संबंधित अधिकारी व कर्मचारी यांनी नागरिकाच्या जीविताचे रक्षण करण्याच्या दृष्टीने पूर्णपणे कायदेशीर, तातडीची आणि मानवतावादी हेतूने कार्यवाही केली असून, त्यातून कोणताही अनुचित हेतु, कृत्य अथवा अनियमितता झालेली नाही. या घटनेतील अधिकाऱ्यांची कार्यवाही Good Samaritan Guidelines, भारत सरकार (MoRTH - Ministry of Road Transport and Highways) तसेच मोटार वाहन कायदा कलम १३४- यांच्या तरतुदीनुसार केली आहे. Good Samaritan नियमांनुसार रस्त्यावर अपघात किंवा वैद्यकीय आपत्कालीन स्थिती आढळल्यास कोणतीही व्यक्ती किंवा शासकीय अधिकारी तात्काळ मदत करू शकतो आणि अशा मदतीस कायदेशीर संरक्षण दिले जाते. अशा व्यक्तीवर कोणतेही नागरी किंवा फौजदारी दायित्व येत नाही. कोणत्याही अधिकाऱ्याने किंवा नागरिकाने जखमी व्यक्तीला उपचारासाठी रुग्णालयात पोहोचविले असल्यास त्याची चौकशी किंवा छळवणूक करू नये आणि त्याची जबाबदारी निश्चित करता येत नाही, असे स्पष्ट निर्देश केंद्र सरकारने दिले आहेत. मोटार वाहन कायदा कलम १३४- मध्येही जखमी व्यक्तीस तात्काळ वैद्यकीय मदत उपलब्ध करून देणे हे कायदेशीर कर्तव्य मानले असून अशा प्रसंगी मदत करणाऱ्या व्यक्तीस संपूर्ण संरक्षण दिले जाते. या तरतुदींनुसार कोणताही संशय किंवा विलंब न करता जीव वाचविण्यास प्राधान्य देणे अपेक्षित आहे. या प्रकरणात अधिकारी व चालक यांनी हीच कायदेशिर, मानवतावादी आणि जीवनरक्षणाची जबाबदारी पूर्णपणे पार पाडलेली आहे. योग्य, वस्तुनिष्ठ आणि सत्य परिस्थिती जनतेपर्यंत पोहोचणे आवश्यक आहे. त्यामुळे प्रसार माध्यमांमध्ये चुकीची माहिती प्रसारित होऊ नये आणि जनतेपुढे अचूक माहिती जावी याकरीता उप प्रादेशिक परिवहन अधिकारी चंद्रमोहन चिंतल यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे हा खुलासा केला आहे.

# जिल्ह्यात हुंडा विरोधी सप्ताहाचे आयोजन

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना (प्रतिनिधी)** महिला व बाल विकास मंत्रालय मुंबई शासन राजपत्र दि. २५ जुलै, २०१६ अन्वये हुंडा प्रतिबंधक अधिनियम १९६१ च्या कलम ८ (ब)(१) आणि महाराष्ट्र राज्य हुंडा प्रतिबंधक नियम २००३ च्या नियम ४ नुसार राज्यस्तरावर आयुक्त, महिला व बाल विकास, महाराष्ट्र राज्य पुणे, जिल्हास्तरावर जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी अणि तालुकास्तरावर बाल विकास प्रकल्प अधिकारी हे हुंडा प्रतिबंधक अधिकारी म्हणून घोषित करण्यात आलेले आहेत.

तरी प्रत्येक हुंडा प्रतिबंधक अधिकारी आणि जिल्ह्यातील सर्व सुजान नागरिकांनी २६ नोव्हेंबर हा दिवस हुंडाबंदी दिन म्हणून तर त्यापुढील ७ दिवस हुंडा बंदी सप्ताह म्हणून साजरा करावा, असे आवाहन जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, जालना यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.

सध्यस्थितीमध्ये असे प्राकर्षाने निदर्शनास येत आहे की, समाजामध्ये हुंडा प्रथा अजूनही कायम असून या कुप्रथेच्या निर्दोष महिला बळी पडत आहेत.

विवाहाच्या वेळी मागितलेला आर्थिक लाभ, रोख रक्कम अथवा विवाहच्यावेळी अथवा विवाहानंतर केंव्हाही जी रक्कम किंवा मालमत्ता, वस्तु, दागदागीने ईत्यादी मागण्यात येते त्याला हुंडा समजले जाते. सदर कायदा असूनही त्यांची प्रभावीपणे अंमलबजावणी होताना दिसून येत नाही. या कुप्रथेला आळा बसणे नितांत आवश्यक आहे .

तरच समाजामध्ये महिला निर्भीडपणे जगू शकतील. या करीता जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी आणि बाल विकास प्रकल्प अधिकारी यांनी त्यांचे कार्यकक्षेत अतिशय जागृतपणे सदर कायदयाची प्रभावी अंमलबजावणी करणे करीता प्रचार प्रसिध्दी करणे आवश्यक आहे.

हुंडा देणे, घेणे किंवा घेण्यास प्रोत्साहन तसेच गुन्हा घडल्यास नमुद अधिनियमातील तरतुदीनुसार कार्यवाही करणे आवश्यक आहे. समाजातुन या कुप्रथेचे समुळ उच्चाटन करणे आवश्यक आहे. असेही कळविले आहे.

# विश्वासराव पंडीतराव जोगलादेवीकर यांचे दुःखद निधन

आत्ताच एक्सप्रेस

अंबड/ प्रतिनिधी/ अंबड शहरातील विश्वासराव पंडीतराव जोगलादेवीकर (वय ६९) यांचे आज, २३ नोव्हेंबर रोजी दुःखद निधन झाले. ते अंबड तालुक्यातील मंडळ अधिकारी म्हणून अनेक वर्षे कार्यरत होते आणि त्यांच्या कामाच्या पद्धतीमुळे ते सर्वांमध्ये आदरणीय मानले जात होते. त्यांच्या व्यक्तिमत्त्वामध्ये प्रामाणिकपणा, दयाळूपणा आणि समाजसेवेची भावना अधोरेखित होती.

विश्वासराव जोगलादेवीकर यांचे अंत्यसंस्कार अंबड येथील हिंदु स्माशनभूमीत पारंपारिक विधीने आणि अत्यंत श्रद्धाभावाने करण्यात आले.

# राष्ट्रीय कुटुंब कल्याण नियोजन कार्यक्रम अंतर्गत पुरुष नसबंदी शस्त्रक्रिया पंधरवडा

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना (प्रतिनिधी)** सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत राष्ट्रीय कुटुंब कल्याण नियोजन कार्यक्रम अंतर्गत पुरुष नसबंदी शस्त्रक्रिया पंधरवडा दि.२१ नोव्हेंबर ते ४ डिसेंबर २०२५ या कालावधीमध्ये राबविण्यात येत आहे. सदरील मोहिमेचे घोषवाक्य -' स्वस्थ व आनंदी कुंटूंबाचे स्वप्न, पुरुषांच्या सहभागातुनच साकार ' पुरुष नसबंदी शस्त्रक्रिया पंधरवडा पंधरवडा दोन टप्प्या मध्ये होणार आहे. पहिल्या टप्पा - संपर्क आठवडा कालावधी २१ नोव्हेंबर ते २७ नोव्हेंबर २०२५. दुसरा टप्पा - सेवा आठवडा कालावधी दि.२८ नोव्हेंबर ते ४ डिसेंबर २०२५. पहिल्या टप्प्यात पुरुष नसबंदी बाबत जनजागृती करणे, जनतेला पुरुष नसबंदीचे महत्व सांगुन प्रवृत्त करणे, कुंटुंब नियोजन शस्त्रक्रिया ही केवळ स्त्रिची जबाबदारी नसुन पुरुषांची सुध्दा आहे, याबाबत समुपदेशन करणे. स्त्री नसबंदी शस्त्रक्रियापेक्षा सोपी व सुलभ असल्याबाबत माहिती देणे व योग्य जोडप्यांच्या याद्या तयार करुन त्यांना संपर्क साधणे व पुरुष नसबंदी शस्त्रक्रियेस प्रवृत्त करणे. दुस-या टप्प्यात पुरुष नसबंदी शस्त्रक्रिया शिबीरे आयोजित करुन शस्त्रक्रिया करणे. मोफत सेवा देवुन प्रती एक पुरुष नसबंदी शस्त्रक्रिया लाभार्थ्यांस १४५१/- रु. प्रोत्साहनपर अनुदान देण्यात येणार आहे. पुरुष नसबंदी शस्त्रक्रिया पंधरवडा या मोहिमेत जास्तीत जास्त पुरुषांनी नसबंदी शस्त्रक्रिया करुन घ्यावी. असे जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद, जालना. यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.

---

रजिस्ट्री से. डी. एल. ३३००४/९९ | REGD. No. D. -33004/99

भारत का राजपत्र

सत्यमेव जयते

# The Gazette of India

सी. जी. डी. एल. अ. ०१०३२०२५-२६१३८७
CG-DL-E-01032025-261387

**असाधारण**
EXTRA ORDINARY
भाग II-खण्ड ३ उपखण्ड (ii)
P-RT II Section 3-Sub-section (ii)
प्राधिकार से प्रकाशित
PUBLISHED BY AUTHORITY

सं. १०२२ | नई दिल्ली, शुक्रवार, फरवरी २८, २०२५/फाल्गुन ९, १९४६
No. 1022 | NEW DELHI, FRID-Y, FEBRU-RY 28, 2025 / PH-LGUN- 9, 1946

**सड़क परिवहन और राजमार्ग मंत्रालय**
**अधिसूचना**
**नई दिल्ली, २८ फरवरी २०२५**

का. आ. १०३० (अ).-केन्द्रीय सरकार, राष्ट्रीय राजमार्ग अधिनियम १९५६ (१९५६ का ४८) (जिसे इसमें इसके पश्चात् उक्त अधिनियम कहा गया है) की धारा ३ क की उपधारा (१) द्वारा प्रदत्त शक्तियों का प्रयोग करते हुए, यह समाधान हो जाने के पश्चात् कि महाराष्ट्र राज्य के जालना जिले में राष्ट्रीय राजमार्ग संख्या ७५३ एच के सी.एच.८+०००, सी.एच. ३५+४८८ तथा सी.एच. ३+३०० पर तीन नये पुलो के निर्माण का अनुरक्षण, प्रबन्धन और प्रचालन के लोक प्रयोजन के लिए वह भूमि अपेक्षित है जिसका संक्षिप्त वर्णन नीचे अनुसूची में दिया गया है, ऐसी भूमि का अर्जन करने के अपने आशय की घोषणा करती है।

कोई भी व्यक्ति, जो भूमि में हितबद्ध है, उक्त अधिनियम की धारा ३ग की उपधारा (१) के अधीन पूर्वोक्त प्रयोजन के लिए ऐसी भूमि के उपयोग पर राजपत्र में इस अधिसूचना के प्रकाशन की तारीख से इक्कीस दिन के भीतर अपनी आपत्ति प्रकट कर सकेगा।

ऐसी प्रत्येक आक्षेप सक्षम प्राधिकारी, तथा उपविभागीय अधिकरी/ भूसंपादन विभाग को लिखित रूप में किया जायगा और उसमें उसके आधार अधिकथित किए जाएंगे और सक्षम प्राधिकारी, आपत्तिकर्ता को व्यक्तिगत रूप मे या किसी विधि व्यवसायी द्वारा सुने जाने का अवसर देगा और ऐसी आक्षेपो की सुनवाई के पश्चात् तथा ऐसी और जाँच करने के पश्चात् यदि कोई हो, जिसे सक्षम प्राधिकारी आवश्यक आदेश द्वारा या तो आपतियों को अनुज्ञात कर मरेगा का अननुज्ञात कर सकेगा।
उक्त अधिनियम की धारा ३ग की उपधारा (२) के अधीन सक्षम प्राधिकारी द्वारा किया गया कोई भी आदेश अंतिम होगा।
उपलब्ध हैं और उनका हितबद्ध व्यक्तियों द्वारा निरीक्षण किया जा सकता है। इस अधिसूचना के अंतर्गत आने वाली भूमि के रेखांक और अन्य ब्यौरे सक्षम प्राधिकारी के उक्त कार्यालय में उपलब्द है और उनका हितब्द व्यक्तियों व्दारा निरीक्षण किया जा सकता है ।

**अनुसूची**

**महाराष्ट्र राज्य के जालना जिले मे राष्ट्रीय राजमार्ग संख्या ७५३ एच के सी.एच.८+०००. सी. एच. ३५+४८८तथा सी.एच. ३+३०० पर तीन नये पुलों के निर्माण के लिए अर्जन की जाने वाली संरचना रहित अथवा संरचना सहित भूमि का संक्षिप्त विवरण.**

| **राज्य का नामः महाराष्ट्र** | | | **जिले का नामः जालना** | | |
|---|---|---|---|---|---|
| क्रमिक संख्या | सर्वेक्षण संख्या | भूमि का प्रकार | भूमि की प्रकृति | भूमि का क्षेत्रफल (स्थानीय इकाई) | भूमि का क्षेत्रफल (हेक्टेयर) |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| **तालुक का नामः जालना** | | | | | |
| **गांव का नामः गोलापांगरी** | | | | | |
| 1 | 12 | सरकारी | औद्योगिक | ०.१८४ (हेक्टेयर) | ०.१८४ |
| 2 | 13 | सरकारी | औद्योगिक | ०.३५२ (हेक्टेयर) | ०.३५२ |
| | | | | Total | **०.५३६** |

का नं: RO/MUM/NH (O)/2023-24/12/3A1
अभय जैन, निवेशक

MINISTRY OF ROAD TRANSPORT AND HIGHW-YS
NOTIFICATION
New Delhi, the 28th February 2025

**S.O.1030** (E). - In exercise of powers conferred by sub-section (1) of section 3A of the National Highways act, 1956 (48 of 1956) (hereinafter referred to as the said act), the Central Government, after being satisfied that for the public purpose, the land, the brief description of which is given in the Schedule below, is required for Construction of three major bridges at Ch.8+000, Ch.35+488 and Ch.3+300 of National Highway No.753H in the district Jalna in the state of MAHARASHTRA, hereby declares its intention to acquire such land.

any person interested in the said land may, within twenty-one days from the date of publication of this notification in the Official Gazette, raise objections to the use of such land for the aforesaid purpose under sub- section (1) of section 3C of the said act.

Every such objection shall be made to the Competent authority, namely, the SDO/LAD in writing and sh set out the grounds thereof and the Competent authority shall give the objector an opportunity of being heard, in person or by a legal practitioner, and may, after hearing all such objections and after making such further enquiry, if any, as the Competent authority thinks necessary, by order, either Alow or disallow the objections.

any order made by the Competent authority under sub-section (2) of section 3C of the said act shall be final.

The land plans and other details of the land to be covered under their notification are available and can be inspected by the interested person at the aforesaid office of the Competent authority.

## SCHEDULE

Brief description of the land to be acquired, with or without structure falling within the stretch of the land From Ch.8+000, Ch.35+488 and Ch.3+300 of National Highway No.75311 in the district Jalna in the state of Maharashtra.

| State: MAHARASHTRA | | | District: Jalna | | |
|---|---|---|---|---|---|
| Sl. No. | Survey/Plot Number | Type of Land | Nature of Land | area (in Local Unit) | area (in Hectares) |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| Taluk: Jalna | | | | | |
| Village: Golapangri | | | | | |
| 1 | 12 | Government | Industrial | 0.184 (Hectare | 0.184 |
| 2 | 13 | Government | Industrial | 0.352 (Hectare) | 0.352 |
| | | | | **Total** | **0.536** |

F. No. RO/MUM/NH(O)/2023-24/12/3A1

**SD/-**
**ABHAY JAIN,**
**Director**

**जिमाका/जालना/जाहि./०९/२०२५**

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक सुग्रीव सोपानराव मुंढे यांनी निरंकारजी प्रिंट अॅण्ड पब्लिकेशन, पी-३०/०/२,गुलमोहर कॉलनी,एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र), येथे छापून पी-३०/०/२, गुलमोहर कॉलनी, एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
मुख्यकार्यालय-०२४०-२४७४८१३, संपादक-सुग्रीव सोपानराव मुंढे मो.९४२१२८१०७८ , RNI.No.MAH/MAR2011/39247
The Printer, Owner & Publisher **Sugriv Sopanrao Mundhe** Print at Nirankarji Print & Publication, P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003 (M.H.) Published at P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003. (**Editor - Sugriv Sopanrao Mundhe**) Office Ph. : 0240-2474813